महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन ज्ञापन क्रमांक दुरूस्ती-१०१८/प्र.क्र.३९१/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक ०७ मार्च २०१९.

विषय :- पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या अधिपत्याखालील नागपाडा पोलीस ठाणे येथील पोलीस वसाहतीतील इमारतींची अंतर्गत व बाह्य संरचनात्मक दुरूस्ती व नूतनीकरण यांची विवक्षित कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-
१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ १३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
३) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोआ/ कक्ष-८(४)/शा.१२४/२०१८, दिनांक १८.०५.२०१८.

ज्ञापन.-

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांनी नागपाडा पोलीस ठाणे येथील पोलीस वसाहतीतील इमारतींची अंतर्गत व बाह्य संरचनात्मक दुरूस्ती व नूतनीकरण यांची विवक्षित कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त कामासाठी उप अभियंता, बांधकाम (सा.बां.) उपविभाग क्र.२, वरळी, मुंबई, यांनी सन २०१७-१८ च्या राज्य ई-दरसूचीनुसार तयार केलेले रु.४,१०,९०,६९८/- इतक्या खर्चाचे अंदाज सादर केले असून ते कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते पुढील तक्त्यात निर्दिष्ट केल्याप्रमाणे एकूण **रु. ३,९८,८८,८०९/-** असे सुधारित केले आहेत आणि त्याप्रमाणे, विवक्षित अटींवर, प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे:-

अ.क्र. *(१)*	**कामाचे नाव** *(२)*	**खर्चाचे अंदाज** *(३)*
१.	*"MOW to external structural repairs and renovation with external painting and sanitary fitting in 'A' Block, Nagpada M.T. compound."*	रु.५९,१३,२०६/-
२.	*"MOW to internal structural repairs and renovation with external painting and sanitary fitting in 'A' Block, Nagpada M.T. compound."*	रु.५४,९२,९६९/-

अ.क्र. (१)	कामाचे नाव (२)	खर्चाचे अंदाज (३)
३.	*"MOW to <u>external</u> structural repairs and renovation with external painting and sanitary fitting in '<u>B</u>' Block, Nagpada M.T. compound."*	रु.५९,१३,२०६/-
४.	*"MOW to <u>internal</u> structural repairs and renovation with external painting and sanitary fitting in '<u>B</u>' Block, Nagpada M.T. compound."*	रु.५४,९२,९६९/-
५.	*"MOW to <u>external</u> structural repairs and renovation with external painting and sanitary fitting in '<u>C</u>' Block, Nagpada M.T. compound."*	रु.६३,१६,९६९/-
६.	*"MOW to <u>internal</u> structural repairs and renovation with external painting and sanitary fitting in '<u>C</u>' Block, Nagpada M.T. compound."*	रु.४६,४१,३९३/-
७.	*"MOW to 10 P.I. and 30 Constabulary Quarters with external structural repairs and renovation with external painting and sanitary fitting at Nagpada Police compound."*	रु.३०,६६,३३५/-
८.	*"Strengthening 10 P.I. and 30 Constabulary Quarters at Nagpada and plaster and painting, renovation of W.C. and bath and drainage line."*	रु.३०,५२,३०२/-
एकूण-		**रु. ३,९८,८८,८०९/-**

४. त्या अनुसार, नागपाडा पोलीस ठाणे येथील पोलीस वसाहतीतील इमारतींची अंतर्गत व बाह्य संरचनात्मक दुरूस्ती व नूतनीकरण यांची, परिच्छेद <u>३</u> मधील तक्त्यातील स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे, एकूण **रु. ३,९८,८८,८०९/-** *(रुपये तीन कोटी, अठ्याण्णव लक्ष, अठ्याऐंशी हजार, आठशे नऊ रुपये फक्त)* इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटीवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१) निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरू करू नये.

२) खर्चाचे अंदाज हे पोलीस सह आयुक्त (प्रशासन), बृहन्मुंबई, यांनी साक्षांकित करणे आवश्यक आहे.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, ००, १०८, राज्य मुख्यालय पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२)(०१) शहर पोलीस-आस्थापना (दत्तमत)(अनिवार्य) (२०५५ ००९७), २७, लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५९४/१८/इमा.-२, दिनांक २४.१२.२०१८, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०७२००६५६३७२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad0118449
3f2735ad885627, postalCode=400032, street=2ND
FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI,
serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b9532
2e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF
MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.03.07 20:08:16 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

प्रत-

१) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, मुंबई *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी सुधारलेल्या "Abstracts" च्या प्रतीसह).*
२) कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी सुधारलेल्या "Abstracts" च्या प्रतीसह).*
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
५) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवड फाईल (पोल-७).